प्रकरण पाचवे

# संजीवनी टीकेची साहित्यिक समीक्षा

# प्रकरण ५ वे
# 'संजीवनी' टीकेची साहित्यिक समीक्षा

## ५.० प्रास्ताविक :

महाकवी कालिदासाचे मेघदूत हे संस्कृत साहित्यातील सुंदर खंडकाव्य आहे. या खंडकाव्यावर मल्लिनाथाने संजीवनी टीका लिहिली आहे. या टीकेत टीकाकाराने रस, भाव, ध्वनी, अलंकार, छंद इत्यादी साहित्यशास्त्रीय संकल्पनांचा उपयोग केलेला आहे. मल्लिनाथाने या टीकेत अर्थान्तरन्यास, परिणाम विषम वगैरे अलंकाराचा निर्देश केला आहे. हे संपूर्ण काव्य 'मन्दाक्रांता' छंदामध्ये रचलेले आहे. तसेच नायिकेच्या विरहावस्थेचे वर्णन करताना विप्रलम्भ शृंगार हा रस आढळतो. याशिवाय टीकाकाराने टीकेत अनेक पौराणिक आणि भौगोलिक संदर्भ दिले आहेत. या सर्वांचा अभ्यास या प्रकरणात करणार आहोत.

## ५.१ अलंकार :

अलंकार या शब्दाचा प्रयोग साहित्यशास्त्र ग्रंथामध्ये अलंकरण (आभूषण) या अर्थाने प्रसिद्ध आहे. संस्कृत वाङ्मयात अनेक वेळा अलंकार हा शब्द 'आभूषण' या शब्दाचा पर्यायवाची शब्द म्हणून आला आहे.[१] ते आभूषण दोन प्रकारांनी वर्णिलेले दिसते (१) बाह्य आणि (२) आन्तर. उदा. १) बाह्य आभूषण – कवच, कुण्डले इ. २) आन्तर आभूषण – विद्या, विजय, शौर्य इत्यादी. ही आन्तर आभूषणे गुणांमध्ये अन्तर्भूत होतात, अलंकारात नाही. बाह्य अलंकाराचा अलंकार या अर्थाने व्यवहार होतो. उदा. उपमा, उत्प्रेक्षा, स्वभावोक्ती इत्यादी अलंकार. शब्दाच्या व्युत्पत्तीतून हाच अर्थ दिसून येतो.

अलंकार हा शब्द अलं + कृ या धातूपासून बनला आहे. 'अलम्' हे अव्यय भूषण वाचक आहे. अलंकृ म्हणजे भूषण धारण करणे आणि अलंकार म्हणजे भूषविण्याची साधने – जसे – पुष्प, पुष्पहार, आभरण इत्यादी.

मल्लिनाथाने मेघदूतातील संजीवनी टीकेत एकूण आठ अलंकारांचा निर्देश केलेला आहे. त्यांचे विवेचन पुढीलप्रमाणे –

## (१) अर्थान्तरन्यास अलंकार -

कालिदासाच्या मेघदूतात अर्थान्तरन्यासाचे प्रमुख दोन प्रकार योजलेले दिसून येतात. ते असे- १) कवीने श्लोकातील पहिल्या तीन पादांतील विशेषाचे चौथ्या पादांतील सामान्य उक्तीद्वारा साधर्म्याने अगर वैधर्म्याने समर्थन केले आहे. २) कवीने श्लोकातील पहिल्या दोन पादांतील विशेषाचे तिसऱ्या व चौथ्या पादांतील सामान्य उक्तीद्वारा साधर्म्याने अगर वैधर्म्याने समर्थन केले आहे.

या दोन प्रकारातील पहिल्या प्रकाराचे प्राचुर्य अधिक ठिकाणी आढळते. या प्रकरणामध्ये फक्त मल्लिनाथाने संजीवनी टीकेत ज्या श्लोकांमध्ये अर्थान्तरन्यास सांगितला आहे त्याचाच विचार करणार आहोत.

(१) श्लोक क्र.३. (पू.मे.)

तस्य स्थित्वा कथमपि पुर: कौतुकाधानहेतो -
रन्तर्बाष्पश्चिरमनुचरो राजराजस्य दध्यौ ।
मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेत:
कण्ठाश्लेषप्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे ।।

प्रस्तुत श्लोकात नूतन मेघाला पाहून यक्षाच्या मनात विकार उत्पन्न होणे या गोष्टीचे समर्थन तिसऱ्या व चौथ्या ओळीने केले आहे. इथे प्रस्तुत विशेष आहे. त्याचे समर्थन सामान्य उक्तीने वैधर्म्यपूर्वक केले आहे.

मल्लिनाथाने या अलंकाराचे लक्षण दण्डीच्या काव्यादर्शमधून उद्धृत केले आहे.

ज्ञेय: सोऽर्थान्तरन्यासो वस्तु प्रस्तुत्य किंचन ।
तत्साधनसमर्थस्य न्यासो योऽन्यस्य वस्तुन: ।।[२]

साहित्यशास्त्रकारांनी सांगितलेल्या 'सामान्यद्वारा विशेषाचे वैधर्म्याने समर्थन' या प्रकारचे हे उदाहरण आहे.

श्लोक क्र.३. (पू.मे.)

धूमज्योति: सलिलमरुतां सन्निपात: क्वमेघ:
संन्देशार्था: क्व पटुकरणै: प्राणिभि: प्रापणीया: ।

इत्यौत्सुक्यादपरिगणयन् गुह्यकस्तं ययाचे

कामार्ता हि प्रणयकृपणाश्चेतनाचेतनेषु ।।

या अलंकाराचा आधार कामी व्यक्तीची मन:स्थिती दाखविणे हा आहे. अशा व्यक्तीची बुद्धी चेतन व अचेतन यांच्या बाबीत विवेकरहित होते असे या श्लोकात अर्थान्तरन्यास अलंकार योजून सांगितले आहे. या अर्थान्तरन्यासाने कालिदासाने मनुष्याच्या भावविकारांचे सूक्ष्म अवलोकन केले आणि त्यांना शब्दबद्ध केले.

श्लोक क्र.६. (पू.मे.)

जातं वशे भुवनविदिते पुषकरावर्तकानां

जनामित्वां प्रकृतिपुरुषं कामरुपं मघोन: ।

तेनार्थित्वं त्वयि विधिवशाद् दूरबन्धुर्गतोऽहं

याञ्चा मोधा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ।।

या श्लोकात मल्लिनाथाने 'प्रेय' नामक अलंकार सांगून दण्डीने दिलेले लक्षण उद्‌धृत केले आहे.[३] या श्लोकात अर्थान्तरन्यासाचा प्रयोग करताना कालिदासाने एका अत्यंत सुंदर सुभाषिताचा प्रयोग केला आहे. तो असा की, चांगल्या माणसाकडून नकार मिळाला तरी चालेल पण अधमाकडून ती पूर्ण होत असली तरी त्याच्याकडे याचना करू नये. या श्लोकामध्ये कालिदासाने मित्रत्वाने सल्ला दिला की, आपली इच्छा योग्य मार्गाने पूर्ण करावी. अधमाच्या मदतीने इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न कधी सफल होत नाही. हा सामान्य मनुष्याला अनुभव येतोच.

श्लोक क्र.८. (पू.मे.)

त्वामारूढं पवनपदवीमुद्‌गृहीतालकान्ता

प्रक्षिष्यन्ते पथिकवनिता: प्रत्ययादाश्वसन्त्य: ।

क: संनद्धे विरहविधुरां त्वय्युपेक्षेत जायां,

न स्यादन्योऽप्यहमिव जनो य: पराधीनवृत्ति: ।।

वरील श्लोकात विशेषाचे समर्थन सामान्याद्वारा वैधर्म्याने केले आहे. कारणद्वारा कार्याचे समर्थन या प्रकारामध्येही याचा समावेश होऊ शकतो. इथे कार्य म्हणजे 'प्रत्ययादाश्वसन्त्य: पथिकवनिता प्रेक्षिष्यन्ते' हे असून त्याचे समर्थन 'क: संनद्धे विरहविधुरा ......' म्हणजे तुला

पाहून कोण बरे विरहाने व्याकूळ झालेल्या पत्नीची उपेक्षा करील? अर्थात तो उपेक्षा करणार नाही या कारणाने केले आहे.

मल्लिनाथाने इथे अर्थान्तरन्यास अलंकार सूचित करताना विद्यानाथाने दिलेले अर्थान्तरन्यासाचे लक्षण उद्धृत केले आहे.[४]

श्लोक क्र.१०. (पू.मे.)

तां चावश्य दिवसगणनातत्परामेकपत्नी-
मव्यापन्नामविहितगतिर्द्रक्ष्यसि भ्रातृजायाम्।
आशाबन्ध: कुसुमसदृशं प्रायशो ह्यङ्गनानां,
सद्य:पाति प्रणयि हृदयं विप्रयोगे रुणद्धि।।

या श्लोकातील तिसऱ्या व चौथ्या ओळीत आलेल्या 'आशाबन्ध: ..... रुणद्धि' या कारणद्वारा पहिल्या व दुसऱ्या ओळीत सांगितलेले कार्य म्हणजे कशी तरी जीवन कंठित आहे. याचे साधर्म्याने समर्थन केले आहे. म्हणून या श्लोकात कार्यकारण भावाधारे अर्थान्तरन्यास अलंकार होतो.

या श्लोकात कालिदासाने अर्थान्तरन्यास अलंकाराचा प्रयोग करताना पतीपासून दूर असलेल्या प्रेमविवश पत्नीच्या हृदयाचे हृदयंगम चित्रण केले आहे. इथे असे सांगितले आहे की, स्त्रियांचे हृदय विशेषत: पतिवियोगकाळी कुसुमसदृश आणि कोमल असते, ते ताबडतोब तुटून जाऊ शकते. पण पतीचे मीलन होईल या आशारूपी धाग्याने कसे तरी तगून राहिलेले असते.

श्लोक क्र.४७. (पू.मे.)

तत्र स्कन्दं नियतवसतिं पुष्पमेघीकृतात्मा
पुष्पासारै: स्नपयतु भवान् व्योमङ्गजलार्द्रै:।
रक्षाहेतोर्नवशशिभृता वासवीनां चमूना-
मात्यादित्यं हुतवहमुखे संभृतं तद्धि तेज:।।

यक्ष मेघाला उद्देशून असे म्हणतो की, "देवगिरी पर्वतावर कायमचे वास्तव्य करून राहिलेल्या कार्तिकेयाला तू स्वत: पुष्पवृष्टी करणारा मेघ बनून आकाशगंगेच्या जलाने ओलसर झालेल्या पुष्पांच्या वृष्टीने स्नान घाल." या विशेष वाक्याचे समर्थन अथवा "तू त्याला स्नान घाल." या

कार्याचे समर्थन अनुक्रमे सामान्यद्वारा वा कारणाद्वारा केले आहे. ते असे की, कार्तिकेय पूज्य म्हणजेच अर्चना-योग्य आहे. या उक्तिद्वारा समर्थन केले आहे.

वास्तविक या श्लोकात अलंकार दृष्टीने पाहता इथे काही अलंकाराची जी प्रयोजक चमत्कृती ती दिसत नाही आणि समर्थन वाक्य दुसऱ्या आणि तिसऱ्या ओळीत समजते. पण शब्दश: प्रतिपादन केले नसल्यामुळे इथे अर्थान्तरन्यास अलंकार सुस्पष्ट होत नाही.

परंतु मल्लिनाथाने टीकेत अर्थान्तरन्यास अलंकार दाखविला आहे. पही - स्कन्दस्य पूज्यत्वसमर्थनेनार्थेनार्थान्तरं न्यस्यति रक्षेति।[५]

श्लोक क्र.२६.

शेषान् मासान् विरहदिवसस्थापितस्यावधेर्वा
विन्यस्यन्ती भुवि गणनया देहलीदत्तपुष्पै: ।
संभोगं वा हृदयनिहितारम्भमास्वादयन्ती
प्रायेणैते रमणविरहे ह्यङ्गनानां विनोदा: ।।

प्रस्तुत श्लोकातील पहिल्या तीन ओळीत दोन विशेषांचा उल्लेख असून त्याचे समर्थन चौथ्या ओळीत आलेल्या सामान्य उक्तिद्वारा साधर्म्याने केले आहे. म्हणून इथे अर्थान्तरन्यास अलंकार आहे.

प्रियकरांपासून वियोग घडलेल्या स्त्रिया कशाप्रकारे आपला वियोगातील काळ कंठत असतात याचे सुरेख चित्र यात आहे. या श्लोकात उंबरठ्यावर ठेवलेली फुले जमिनीवर मोजून ठेवीत वियोगाचे महिने मोजणे आणि आपल्या प्रियकराशी होणाऱ्या मीलनांची चित्रे आपल्या संकल्पानेच निर्माण करीत, अनुभवीत बसणे या दोन विशेषांचा निर्देश आहे. त्याचे समर्थन 'प्रायेणैते रमणविरहे ह्यङ्गनानां विनोदा:' या सामान्य उक्तिद्वारा केले आहे.

श्लोक क्र.३२.

सा संन्यस्ताभरणमबला पेशलं धारयन्ती
शय्योत्सङ्गे निहितमसकृद् दु:खदु:खेन गात्रम् ।
त्वामप्यस्त्रं नवजलमयं मोचयिष्यत्यवश्यं
प्राय: सर्वोभवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा ।।

या श्लोकात पहिल्या तीन ओळीत विशेष आले असून त्याचे समर्थन 'प्राय: सर्वो भवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा' या चौथ्या ओळीतील सामान्य उक्तिद्वारा साधर्म्याने केले आहे, म्हणून इथे अर्थान्तरन्यास अलंकार संभवतो.

यक्षाची पत्नी प्रोषितभर्तृका आहे, त्यामुळे तिने देहभूषा वर्ज्य केली आहे. या गोष्टीचे वर्णन कवी असे करतो की, ती इतकी कृश झाली आहे की तिला दागिन्यांचे ओझे सहन होत नव्हते. तिची ती करुण अवस्था पाहून मेघाच्या हृदयाला पाझर अवश्यमेव फुटेलच!

**विषम अलंकार :**

हा अलंकार प्रथम रुद्रटाने (९.४५-४७) सांगितला असून तो दोन प्रकारचा आहे असे म्हटले आहे. मम्मटाने त्यामध्ये आणखी दोन प्रकारांची भर टाकली आहे. रुय्यकाने मम्मटोक्त तिसरा आणि चौथा प्रकार यांचा एका प्रकारांत समावेश करून 'विषम' तीन प्रकारचा सांगितला आहे.(रुय्यक पृ. १३०-३२)

जेव्हा-केव्हा दोन वस्तूंचा संबंध अनुचित म्हणून प्रतीतीला येत असेल, तेव्हा तशा अर्थाचे विधान म्हणजे 'विषम' अलंकार होय. मम्मटाने 'विषम' अलंकाराचे एकूण चार प्रकार सांगितले आहेत. (१) कधीकाळी अत्यंत विरुद्ध असल्यामुळे संबंध जुळू शकत नाही. (२) कर्त्याला क्रियेचे फळ न मिळता उलट अनर्थ कोसळतो. (३) कारणाचा गुण कार्याच्या गुणापेक्षा भिन्न असतो. (४)कारणाच्या क्रियेविरुद्ध कार्याची क्रिया असते.

श्लोक क्र.५.

धूमज्योति: सलिलमरुतां सन्निपात: क्वमेघ:
सन्देशार्था: क्व पटुकरणै: प्राणिभि: प्रापणीया: ।
इत्यौत्सुक्यादपरिगणयन् गुह्यकस्तं ययाचे
कामार्त्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु ।।

वर मम्मटाच्या सांगितलेल्या चार लक्षणानुसार पहिल्या प्रकारामध्ये प्रस्तुतचा श्लोक येतो. धूर, तेज, पाणी व वायु ह्यांचे संमिश्रण असलेला अचेतन मेघ आणि समर्थ इंद्रिये असलेल्या प्राण्यांकरवी पाठवावयाचा निरोप ही चेतन गोष्ट अशा अत्यंत विरुद्ध गोष्टी असल्यामुळे त्याचा संबंध जुळू शकत नाही म्हणून प्रस्तुतच्या श्लोकात विषम अलंकार सांगितला आहे. याचे लक्षण मल्लिनाथाने आपल्या टीकेत दिलेले आहे.[६]

## (३) भाविक अलंकार :

अस्तित्वात येऊन नष्ट झालेल्या किंवा अद्याप अस्तित्वात यावयाच्या आणि म्हणूनच प्रत्यक्ष अनुभवाचा विषय न होणाऱ्या, अशा पदार्थांचे प्रत्यक्षवत् कथन, म्हणजे 'भाविक' अलंकार होय. अर्थात अशा कथनात भूत किंवा भावी पदार्थांचे प्रत्यक्ष हे खुद्द कवीला किंवा कवीने निर्माण केलेल्या व्यक्तीला होत असल्याचे दाखविलेले असते, त्यांच्या द्वारा त्यांच्याशी समरस होणाऱ्या काव्यरसिकालाही त्या पदार्थाचे अखेर प्रत्यक्ष होते. असे हे अप्रत्यक्ष पदार्थाचे प्रत्यक्ष होण्यास मुळांत कवीचे आणि नंतर रसिकांत संक्रात झालेले 'भाव ' कारणीभूत होते. म्हणून या अलंकाराला 'भाविक' असे नाव मिळाले आहे. मल्लिनाथाने याचा उल्लेख टीकेत केलेला आहे.[७]

श्लोक क्र.३५.

पत्रश्यामा दिनकरह्यस्पर्धिनो यत्र वाहा:
शैलोद्रग्रास्त्वमिव करिणो वृष्टिमन्त: प्रभेदात्।
योधाग्रण्या प्रतिदश मुखं संयुगे तस्थिवांस:
प्रत्यादिष्टाभरणरुचयश्चन्द्रहासव्रणाङ्कै: ।।

प्रस्तुतच्या श्लोकामध्ये रावणाने कुबेरावर स्वारी करून त्याचे पुष्पक विमान हिरावून नेले, त्यावेळच्या संग्रामाचा उल्लेख शेवटच्या दोन ओळीत आलेला आढळतो. ही घटना अस्तित्वात येऊन नष्ट झालेली असल्या कारणाने आणि त्या घटनेचे प्रत्यक्षवत् कथन केलेले असल्यामुळे याठिकाणी भाविक अलंकार होतो.

## (४) स्मरण अलंकार :

एखादी वस्तू पूर्वी अनुभूत असता तिच्यासारखी दुसरी वस्तू पाहताच पूर्वानुभवाप्रमाणे त्या वस्तूचे स्मरण होणे हा स्मरण अलंकार होय.

स्मृतीला कारणीभूत असे संस्कार विविध कारणांनी जागृत होऊ शकत असले, तरी ते जेव्हा पूर्वानुभूत वस्तुसारखी वस्तु पाहिल्याने जागृत होतात आणि त्या पूर्वानुभूत वस्तूची आठवण करून देतात तेव्हा हा स्मरण अलंकार घडतो.

श्लोक क्र.१६.

तस्यातीरे रचितशिखर: पेशलैरिन्द्रनीलै:

क्रीडाशैल: कनककदलीवेष्टनप्रेक्षणीय: ।

मद्गेहिन्या: प्रिय इति सखे चेतसा कातरेण

प्रेक्ष्योपान्तस्फुरिततडितं त्वां तमेव स्मरामि ।।

प्रस्तुत श्लोकामध्ये सभोवती चमकणाऱ्या विजेचे वेष्टन असलेल्या मेघाला पाहिले की यक्षाला क्रीडापर्वताची आठवण होते. कारण त्या पर्वताच्या भोवती सुपर्णकर्दळीचे वेष्टन असल्यामुळे तो त्या मेघाप्रमाणेच दिसतो. शिवाय तो पर्वत यक्षाच्या प्रिय पत्नीचा आवडता असल्यामुळे यक्षाला त्याची लगेच आठवण येते.

मेघ दृष्टीस पडताच क्रीडापर्वताची आठवण होणे याठिकाणी स्मरण हा अलंकार घडतो. मल्लिनाथाने येथे स्मरण अलंकार सूचित करताना टीकेत लक्षण दिलेले आहे.[८]

### (५) उदात्त अलंकार :

मम्मटाने हा अलंकार दोन प्रकारांनी सांगितला आहे. पहिला प्रकार म्हणजे एखाद्या वस्तूच्या समृद्धीचे अर्थात विपुलतेचे, भरभराटीचे वर्णन आणि दुसरा प्रकार म्हणजे जेव्हा एखाद्या वस्तूचे वर्णन करताना तिचा उत्कर्ष दाखविण्यासाठी तिच्याशी संबद्ध अशा थोर व्यक्तींचे वर्णन केले जाते. अर्थात अशा वर्णनात प्रकृत वर्णनीय वस्तू ही मुख्य अंगी ठरते, आणि तिच्या अनुषंगाने वर्णनात आलेल्या थोर व्यक्ति या तिला अंगभूत ठरतात.

श्लोक क्र.१८.

तन्मध्ये च स्फटिकफलका काञ्चनी वासयष्टि:

मूले बद्धा मणिभिरनतिप्रौढवंशप्रकारो: ।

तालै: शिञ्जाकलयसुभगैर्नर्तित: कान्तयामे

यामध्यास्ते दिवसविगमे नीलकण्ठ: सुहृद: ।।

प्रस्तुत श्लोकाचा मम्मटाने वर वर्णन केलेल्या दोन प्रकारांपैकी पहिल्या प्रकाराच्या लक्षणामध्ये समावेश होतो. मोर ज्या काठीवर बसत आहे ती काठी सोन्याची असून ती स्फटिकाच्या शिळेवर बसविली होती व त्या शिळेच्या बुंध्याशी पाचूचे दगड बसविले होते अशी कल्पना

केलेली आहे. या कल्पनेवरून आपल्या लक्षात येते की श्लोकामध्ये ज्या वस्तूंचे वर्णन केले आहे त्या वस्तूंवरून नक्कीच त्या ठिकाणी भरपूर भरभराट असली पाहिजे.

मल्लिनाथाने आपल्या टीकेत या अलंकाराचे लक्षण उद्धृत केले आहे.[९]

## (६) उत्प्रेक्षा अलंकार :

उपमेच्या खालोखाल आणि रूपकाच्या बरोबरीने उत्प्रेक्षा हा अलंकार प्रसिद्ध आणि कविजनप्रिय आहे. वर्ण्य वस्तूची तत्सदृश अन्य वस्तू म्हणून संभावना करणे म्हणजे उत्प्रेक्षा होय.

श्लोक क्र.८.

नेत्रा नीताः सततगतिना यद्विमानाग्रभूमी-
रालेख्यानां नवजलकणैर्दोषमुत्पाद्य सद्यः।
शङ्कास्पृष्टा इव जलमुचस्त्वादृशा जालमार्गे-
र्धूमाद्गाशनुकृतिनिपुणा जर्जरा निष्पतन्ति ।।

प्रस्तुत श्लोकात मेघाच्या ठिकाणी धुराड्यातून बाहेर पडणाऱ्या धुराची संभावना केली आहे. म्हणून या ठिकाणी उत्प्रेक्षा अलंकार आहे.

मल्लिनाथाने संजीवनी टीकेत हा अलंकार सांगितलेला आहे.[१०]

## (७) पूर्णोपमा अलंकार :

दोन वस्तू परस्परांहून भिन्न असतां त्या समान धर्मांनी युक्त असल्याचे दाखविणे म्हणजे उपमा होय. या उपमेचे मुख्य दोन भेद होतात (१) पूर्णा उपमा (२) लुप्ता उपमा. त्यापैकी पूर्णा उपमा म्हणजे उपमेचे सर्व घटक ज्यामध्ये जातीने उपस्थित असतात. तर लुप्ता म्हणजे उपमेतील एक किंवा अनेक घटक ज्यात अनुपस्थित असतात. उपमान उपमेय, साधारण धर्म आणि उपमा प्रतिपादक हे चार घटक ज्यामध्ये जातीने उपस्थित असतात ती पूर्णोपमा होय.

श्लोक क्र.१.

विद्युत्वन्तं ललितवनिताः सेन्द्रचाप सचित्राः
संगीताय प्रहतमुरजाः स्निग्धगम्भीर घोषम्।
अन्तस्तोयं मणिमयभवस्तुङ्गमभ्रंलिहाग्राः
प्रासादास्त्वां तुलयितुमलं यत्र तैस्तैर्विशेषैः ।।

वरील श्लोकात पूर्णोपमा अलंकार सांगितला आहे तो असा – मेघ विजेने युक्त असणे हे उपमान आहे आणि वाड्यात सुंदर स्त्रिया हे उपमेय. मेघ इंद्र धनुष्याने युक्त असणे हे उपमान आणि वाड्यामध्ये सुंदर चित्र असणे हे उपमेय. मेघाने मधुर व गंभीर आवाज करणे हे उपमान तर वाड्यातून संगीतामुळे मृदुंगाचा आवाज येणे हे उपमेय असून यांच्यामध्ये म्हणजेच उपमान उपमेयांमध्ये साधर्म्य आढळत असल्यामुळे इथे पूर्णोपमा अलंकार होतो.

मल्लिनाथाने टीकेमध्ये उत्तरमेघातील पहिल्या श्लोकात पूर्णोपमा हा अलंकार दर्शविला आहे.[११]

## (८) श्रौती पूर्णोपमा अलंकार :

उपमेचे सर्व घटक ज्यामध्ये जातीने उपस्थित असतात ती पूर्णा उपमा होय. या पूर्णोपमेचे श्रौती व आर्थी असे दोन भेद पडतात. 'इव, यथा' इत्यादी शब्दांनी जिचा बोध होतो ती श्रौती पूर्णोपमा होय. 'यथा, इव, वा' इत्यादी शब्द हे उपमान – उपमेयाचे साधर्म्य केवळ 'श्रुती'नेच (म्हणजे, ते शब्द नुसते ऐकण्याने) बोधित करून देतात. त्यामुळे ज्यात साधर्म्याचा बोध 'श्रुती'ने होतो अशा, अर्थात इवादी शब्दांनी युक्त असलेल्या, उपमेला 'श्रौती' म्हणतात.

श्लोक क्र. ६३ :

उत्पश्यामि त्वयि तटगते स्निग्धभिन्नाञ्जनाभे
सद्यः कृत्तद्विरदरदनच्छेदगौरस्य तस्य ।
शोभामद्रेः स्तिमितनयन प्रेक्षणीयां भवित्री–
मंसन्यस्ते सति हलभृतो मेचको वासवीव ।।

प्रस्तुत श्लोकामध्ये 'कृष्णमेघ' हे उपमान असून स्निग्ध अंजन (काजळ) हे उपमेय आहे. तसेच शुभ्र पर्वत हे उपमान आणि हस्तिदंत हे उपमेय असून यांमध्ये उपमान–उपमेयामध्ये साधर्म्य असून श्लोकात 'इव' या पदाचा वापर केला असल्याने त्या ठिकाणी श्रौती उपमा आढळते. मल्लिनाथाने श्लोक ६३ मध्ये हा अलंकार सांगितला आहे.[१२]

उपमा कालिदासस्य ही उक्ती कालिदासाच्या बाबतीत प्रसिद्ध आहे. तरीही मल्लिनाथाने आपल्या टीकेत उपमेचा केवळ दोन ठिकाणीच निर्देश केला आहे. यावरून असे लक्षात येते की, शब्दालंकारापेक्षा अर्थालंकार दाखविण्याकडेच मल्लिनाथाचा कल दिसून येतो.

## ५.२ छंद :

संस्कृत पद्य हे चार चरणांचे असते. हे चरण जेव्हा केवळ अक्षर संख्येनेच निबद्ध झालेले असते तेव्हा त्या प्रकाराला 'छंद' असे म्हणतात. वैदिक ऋचा या छंदोबद्ध आहेत. त्यातील अक्षर संख्येतील बदलांनुसार छंद बदलत जातात. उदा. गायत्री, उष्णिक, अनुष्टुभ् इ. ज्या वेळेस हे चरण अक्षर संख्येप्रमाणेच त्या अक्षरांच्या लघु गुरू क्रमाने निबद्ध झालेले असतात, त्याला 'अक्षर-गणवृत्त' किंवा 'वृत्त' असे म्हणतात. वृत्ते तीन प्रकारात निबद्ध असतात त्याला 'समवृत्त' असे म्हणतात. ज्यातील १-३ व २-४ हे चरण सारखे असतात त्यांना 'अर्धसमवृत्त' म्हणतात. ज्यातील सर्व चरण विषम असतात त्यांना 'विषमवृत्त' म्हणतात.

कालिदासाचे 'मेघदूत' हे काव्य संपूर्ण मन्दाक्रान्तावृत्तात रचलेले आहे असे मल्लिनाथाने आपल्या संजीवनी टीकेत मेघदूतातील पहिल्याच श्लोकात सांगितले आहे आणि ते सांगताना त्याचे लक्षण सुद्धा सांगितले आहे.[१३]

| | |
|---|---|
| मंदाक्रांता। | (समवृत्त) |
| छंद | अत्यष्टि |
| अक्षरसंख्या | प्रत्येक चरणात १७ |
| लक्षण | मंदाक्रांताबुधिरसनगैर्मो भनौ तौ ग युग्मम्। |
| गणयोजना | म,भ,न,त,न,ग,ग (यति ४.६.७)[१४] |

छंद हा विरहाला शोभतो. विरहावस्थेच्या वर्णनाला मंदाक्रांता हे वृत्त योग्य आहे. कारण मेघदूतात सर्वच ठिकाणी यक्ष आणि त्याची प्रिय पत्नी यांचा वियोग दाखविला आहे. म्हणून या संपूर्ण काव्यात मंदाक्रांता हे वृत्त उपयोजिले आहे.

## ५.३ रस :

रस हाच काव्याचा आत्मा आहे म्हणजेच मुख्य प्राण आहे. ही गोष्ट विश्वनाथाने साहित्य दर्पणातील व्याख्येत स्पष्ट केली आहे.

वाक्यं रसात्मकं काव्य दोषास्तस्यपकर्षका:।
उत्कर्ष हेतव: प्रोक्ता गुणालंकाररीतय:।।

(साहित्यदर्पण १.३)

'रस' या धातूचा मूळ अर्थ रुची घेणे, आस्वाद सुख घेणे असा आहे. रसाचा आस्वाद म्हणजे भावनाजागृती, तिचा अनुभव होय. रस ही एक प्रकारची चित्तवृत्ती आहे. प्राचीन साहित्यशास्त्रकारांनी 'तो आनंद किंवा ते सुख परब्रह्मस्वादासारखे असते' असे सांगितले आहे.

'विभावानुभावव्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्ति:' (नाट्यशास्त्र ६.२२) असे भरताने नाट्यशास्त्रात सांगितले आहे. विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या संयोगाने रसनिष्पत्ती होते.

माणसाच्या मनात ज्या भावना कायमच्या पण त्या सुप्त अशा अवस्थेत असतात उदा. प्रेम, शोक, भय, आश्चर्य वगैरे आणि त्यांचे मन आपल्या अधीन करून घेऊन त्यावर स्वामित्त्व चालवू शकतात; अशा स्थिर भावना जेव्हा काव्यांत चित्रित केलेल्या असतात; तेव्हा त्यांना 'स्थायीभाव' आणि त्यांच्या मुख्य कारणांना 'विभाव' सहकारी कारणांना 'व्यभिचारी' (संचारी) भाव आणि कार्यांना 'अनुभाव' अशी पारिभाषिक संज्ञा मिळते.

काव्यांत किंवा नाटकांत ज्या रसांची निर्मिती होताना दिसते ते रस संख्येने आठ आहेत. ज्या स्थायी भावांचे या रसांत पर्यवसान होते, ते स्थायी भावही आठच आहेत ते असे – रति, उत्साह, शोक, क्रोध, भय, विस्मय, हास आणि जुगप्सा. नंतर यांत 'निर्वेद' या स्थायी भावाचाही समावेश होऊन ही संख्या नऊ झाली व रसांची संख्या देखील नऊ झाली. 'स्थायी भाव' हे रस निष्पत्तीसाठी आवश्यक आहेत. या स्थायीभावांचे अनुक्रमे शृंगार, वीर, करुण, रौद्र, भयानक, अद्‌भुत, हास्य, बीभत्स, शांत असे नऊ रस तयार झाले.

कोणत्याही काव्याचा मुख्य रस हा 'वीर' किंवा 'शृंगार' रस आहे. 'शृंगार' रसाचे मुख्य दोन प्रकार पडतात.

(१) संभोग शृंगार (२) विप्रलम्भ शृंगार.

मल्लिनाथाने मेघदूतावरील संजीवनी टीकेत 'विप्रलम्भ शृंगार' हा रस सांगितला आहे.[१५]

## ५.४ भाव –

ज्याठिकाणी अर्थ प्रत्यक्षात समजत नाही त्याठिकाणी अर्थ समजावून सांगितला जातो तो भाव. भाव हा शब्द अर्थ या आर्थी वापरला आहे. प्रत्यक्ष न समजता अप्रत्यक्षपणे जो समजतो तो भाव. कधी कधी हा भाव लक्षणा असतो तर कुठे कुठे व्यंजना सुद्धा होऊ शकतो.

जिथे साक्षात बोध होत नाही तो अर्थ सूचित करण्याचा प्रयत्न भावाद्वारे केला जातो. कदाचित हा भाव लक्ष्यार्थ, व्यंग्यार्थ होऊ शकतो.

मल्लिनाथाने मेघदूतावरील संजीवनी टीकेत जे भाव सांगितले आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत-

**पूर्वमेघ**

श्लोक क्र. (३)

विरहिणां मेघसन्दर्शनमुद्दीपनं भवतीति भाव: ।[१६]

श्लोक क्र. (४)

जीवनार्थं कर्म जीवनप्रदेनैव कर्तव्यमिति भाव: ।[१७]

श्लोक क्र. (६)

दातुर्गुणाढ्यत्वात्प्रियत्वं याञ्चावैफल्यादीषत्प्रियत्वमिति भाव: ।[१८]

श्लोक क्र. (८)

स्वतन्त्रस्तु न कोऽप्युपेक्षेतेति भाव: ।[१९]

श्लोक क्र. (९)

सुखहेत्वादिति भाव: ।[२०]

मन्दं - मन्दमित्यत्र प्रकारार्थे द्विर्भाव: ।[२१]

श्लोक क्र. (११)

शिलींन्ध्राणां भाविसस्यसम्पत्तिसूचकत्वादिति भाव: ।[२२]

श्लोक क्र. (१२)

स्निग्धानां हि चिरविरहसङ्गतानां बाष्पपातो भवतीति भाव:।[२३]

श्लोक क्र. (१३)

"नित्यवीप्सयो:" इति नित्यार्थे द्विर्भाव: ।[२४]

श्लोक क्र. (१४)

"प्रकारे गुणवचनस्य" इति द्विर्भाव: ।[२५]

श्लोक क्र. (१८)

खेचराणामिति भावः।[२६]

श्लोक क्र. (१९)

१) न तु चिरं स्वकार्यविरोधादिति भावः।[२७]

२) अयमपि महांस्ते नयनकौतुकलाभ इति भावः।[२८]

श्लोक क्र. (२०)

"हिमवद्विन्ध्यमल्या गजानां प्रभवाः" इति विन्ध्यस्य गजप्रभवत्वादिति भावः।[२९]

श्लोक क्र. (२१)

यत्र यत्र वृष्टिकार्य कन्दलीमुकुलनीपकुसुमादिकं दृश्यते तत्र तत्र वृष्टमित्यनुमीयत इति भावः।[३०]

श्लोक क्र. (२२)

त्वन्निमित्तत्वासुखलाभस्येति भावः।[३१]

श्लोक क्र. (२५)

दशपीड्चेति भावः।[३२]

"कामिनाभधरास्वादः सुरतादतिरिच्यते" इति भावः।[३३]

श्लोक क्र. (२७)

कामुकदर्शनात्कामिनीनां मुखविकाशो भवतीति भावः।[३४]

श्लोक क्र. (२९)

न तु कण्ठत इति भावः।[३५]

श्लोक क्र. (३०)

स च विधिरेकत्र वृष्टिरन्यत्र सम्भोगस्तदभावनिबन्धनत्वात्कार्श्यस्येति भावः।[३६]

श्लोक क्र. (३१)

स्वर्गार्थानुष्ठितकर्मशेषाणां स्वर्गदानावश्यंभावादिति भावः।[३७]

श्लोक क्र. (३२)

यावद्वातं शब्दानुवृत्तेरिति भावः।[३८]

चाटूक्तिभिविस्मृतपूर्वरतिखेदाः प्रियतमप्रार्थनां सफलयन्नीति भावः।[३९]

श्लोक क्र. (३३)

रत्नाकरादप्यतिरिच्यते रत्नसम्पद्भिरिति भावः।[४०]

श्लोक क्र. (३५)

शस्त्रप्रहारा एव वीराणां भूषणमिति भावः।[४१]

श्लोक क्र. (३७)

प्रियवस्तुसादृश्यादतिप्रियत्वं भवेदिति भावः।[४२]

श्रेयस्करत्वात्सर्वथा यातव्यमिति भावः।[४३]

श्लोक क्र. (३९)

"परैरुपकृताः सन्तः सद्यः प्रत्युपकुर्वते" इति भावः।[४४]

श्लोक क्र. (४२)

जनसंचारस्तासंभावित एवेति भावः।[४५]

श्लोक क्र. (४३)

प्रायेणेच्छाविशेषविघाताद् द्वेषो रोषविशेषश्च कामिनां भवतीति भावः।[४६]

श्लोक क्र. (४४)

अपिशब्दात्प्रवेशमनिच्छौरपीति भावः।[४७]

श्लोक क्र. (४७)

स्वयंपूजाया उत्तमत्वादिति भावः।[४८]

अतः पूज्यमिति भावः।[४९]

श्लोक क्र. (४८)

न तु लौल्यात्तस्वयं छिन्नमिति भावः।[५०]

मार्दङ्गिकभावेन भगवन्तं कुमारमुपास्वेति भावः।[५१]

श्लोक क्र. (४९)

जलसेकस्य वीणाक्वणनप्रतिबन्धकत्वादिति भावः।[५२]

श्लोक क्र. (५३)

दुस्त्यजामपीति भावः।[५३]

बहि:शुद्धोऽपि सूतवधप्रायश्चित्तार्थं सारस्वत-सलिलसेवी तत्र भगवान्बलभद्र एव निदर्शनम्

अतो भवताऽपि सरस्वती सर्वथा सेवितव्येति भावः।[५४]

श्लोक क्र. (५४)

यथा काचित्प्रौढा नायिका सपत्नीमसहमाना स्ववाल्लभ्यं प्रकटयन्ती स्वभर्तारं सह शिरोरत्नेन केशेष्वाकर्षति तद्वदिति भावः।[५५]

श्लोक क्र. (५७)

अतो हिमाचलस्य दावानलस्त्वया शमयित्व्य इति भावः।[५६]

श्लोक क्र. (५८)

क्षुद्रोऽप्यधिक्षिपन्प्रतिपक्षः सद्यः प्रतिक्षेप्तव्य इति भावः।[५७]

श्लोक क्र. (६६)

कामचारित्वाद्वा शिवसेवार्थमिन्द्रागमनाद्वा समागतस्येति भावः।[५८]

मेघपर्वतयोरब्जसूर्ययोरब्धिचन्द्रयोः शिखिजीमूतयोः समीराग्न्योर्मित्रता-स्वयमिति भावः।[५९]

## उत्तरमेघ

श्लोक क्र. (१)

वस्तुतो भिन्नयोः परस्परसादृश्यादभिन्नयोरुपमानोपमेयधर्मयोः पृथगुपादाना द्बिम्बप्रतिबिम्बभावः।[६०]

श्लोक क्र. (२)

कारणं विना कार्यस्यासिद्धेरिति भावः।[६१]

श्लोक क्र. (३)

नित्यानि पुष्पाणि येषां ते तथा न त्वृतुनियमादिति भाव: ।[६२]

श्लोक क्र. (१२)

मन्मथचापोऽपि क्वचिदपि मोघ: स्यादिति भाव: ।[६३]

श्लोक क्र. (२१)

तथा चास्मिन्प्रपञ्चेन कुत्राप्येवंविधं रमणीयं रमणीरत्नेष्वस्तीति भाव: ।[६४]

श्लोक क्र. (२२)

एतावता नेयमन्यति भ्रमितव्यमिति भाव: ।[६५]

श्लोक क्र. (२३)

पूर्ववत्तथापि न भ्रमितव्यमिति भाव: ।[६६]

श्लोक क्र. (२४)

लिखन्ती क्वचित्फलकादौ विन्यस्यन्ती वा चित्रदर्शनस्य
विरहिणीविनोदापायत्वादिति भाव: ।[६७]

श्लोक क्र. (२५)

आर्द्रत्वापहरणाय करेण प्रमृज्यान्यथा क्वणनासम्भवादिति भाव: ।[६८]

श्लोक क्र. (२७)

अतो नान्यथा शङ्कितव्यमिति भाव: ।[६९]

दूतश्चायं मेघ इति भाव: ।[७०]

श्लोक क्र. (२८)

दु:खिनां तु विरित इति भाव: ।[७१]

श्लोक क्र. (२९)

तदा तेषामतीव दु:सहत्वादिति भाव: ।[७२]

पूर्ववदानन्दकरा भविष्यन्तीति बुध्येति भाव: ।[७३]

श्लोक क्र. (३०)

साक्षात संभोगासम्भवादिति भावः।[७४]

स्नेहातुरत्वादिति भावः। स्वप्नहेतुत्वादिति भावः।[७५]

श्लोक क्र. (३२)

"प्रकारे गुणवचनस्य" इति द्विर्भावः।[७६]

श्लोक क्र. (३३)

तस्यभावः सुभगंमन्य भावः।[७७]

श्लोक क्र. (३४)

नयनस्य रुद्धापाङ्गप्रसरत्वादिकं विरहसमुत्पन्नमिति भावः।[७८]

श्लोक क्र. (३५)

संप्रति नखपदोष्माभावेन शीतोपचारस्य तस्य वैयर्थ्यादिति भावः।[७९]

श्लोक क्र. (३६)

अन्यथा निद्राभङ्गः स्यादिति भावः।[८०]

श्लोक क्र. (३७)

दृष्टिप्रतिघातेन वक्तु र्मुखावलोकनप्रतिबन्धकत्वान्विद्युता घोतितव्यमिति भावः।[८१]

अन्यथा शीलत्वादिनैतदनाश्वासनप्रसङ्गादिति भावः।[८२]

श्लोक क्र. (३८)

पान्थोपकारिणो मे किमु वक्तव्यं सुहृदुपकारित्वमिति भावः।[८३]

श्लोक क्र. (४२)

अतिदूरत्वाद् द्रष्टुं श्रोतुं च न शक्य इति भावः।[८४]

श्लोक क्र. (४३)

उपमानकथनमात्रे न कोपिततव्यमिति भावः।[८५]

श्लोक क्र. (४४)

ततो दृष्टिबन्धनाल्लेखनं प्रतिबध्यत इति भाव: ।[८६]

श्लोक क्र. (४८)

त्वत्सौभाग्येनैव जीवामीति भाव: ।[८७]

"न माङ्योगे" इत्यङ्गमाभाव:।[८८]

श्लोक क्र. (५३)

नीचो वदति न कुरुते न वदति सुजन: करोत्येवा इति भाव: ।[८९]

## ५.५ ध्वनी :-

'काव्यस्य आत्मा ध्वनि: ।' 'ध्वनि' हा काव्याचा आत्मा आहे असे आनंदवर्धनाने म्हटले आहे. ध्वनीचे स्वरूप हे सर्व कवींच्या काव्यांचे सार असलेले आणि अत्यंत रमणीय असे आहे. ध्वनी हा गुण किंवा अलंकार नाही. सर्व विद्यांचा पाया व्याकरण हाच असल्याने विद्वानांचे अग्रणी वैय्याकरणी हेच होत. त्यांनी कानांवर पडणाऱ्या वर्णांना 'ध्वनि' असे म्हटले आहे.

काव्याला दोन प्रकारचा अर्थ असतो. एक वाच्य व दुसरा सूचित. पहिला कळला की त्यानंतर, त्यावरून समजणारा असा अर्थ. हा जो दुसरा अर्थ कवींच्या काव्यातून दिसून येतो, तोच काव्याचा आत्मा होय.

मुख्यार्थ किंवा लक्ष्यार्थ यांहून वेगळा असा एक अर्थ प्रतिभावान रसिकाला काव्यांत प्रतीत होत असतो. हा अर्थ व्यंगार्थ होय. काव्यामध्ये व्यंग्यार्थप्रधान असते तेव्हा त्याला 'ध्वनि' असे म्हणतात.

ध्वन्यालोकांत आनंदवर्धनाचार्य म्हणतो की, "जो शब्द व्यंजक असून असा सुंदर अर्थ प्रकाशित करतो की; अर्थाचे ते सौंदर्य त्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही शब्दाने प्रकाशित होऊ शकत नाही, तोच शब्द ध्वनि-काव्य या संज्ञेला पात्र होईल". असे अनेक ध्वनी कालिदासाच्या मेघदूतात आलेले आहेत ज्यांचा निर्देश मल्लिनाथाने आपल्या टीकेत केलेला आहे. ते ध्वनी पुढीलप्रमाणे -

**पूर्वमेघ**

श्लोक क्र. (१६)

दाक्षिण्यभङ्गभयान्नीचमार्गेण निर्गत्य पुन:सर्वाध्यक्ष इव संचरति तद्वदिति ध्वनि: ।[९०]

श्लोक क्र. (१८)

यथा परिश्रान्त: कश्चितकामी कामिनीनां कुचकलशे विश्रान्त: सन्स्वपिति तद्वभवानपि भुवो नायिकाया: स्तन इति ध्वनि: ।[९१]

श्लोक क्र. (२०)

आदौ वमनशोधितस्य पुंस: पश्चाच्छ्लेष्मशोषणाय लघुतिक्तकषायाम्बुपानाल्लब्धवलस्य वातप्रकम्पो न स्यादिति ।[९२]

श्लोक क्र. (३९)

कामिनीदर्शनीयत्वलक्षणं शिवोपासनाफलं सद्यो लप्स्यस्य इति ध्वनि: ।[९३]

श्लोक क्र. (४३)

निषेधात्कार्यहानिर्भविष्यतीति ध्वनि: ।[९४]

**उत्तरमेघ**

श्लोक क्र. (८)

यथा केनचिदन्त: पुरसंचारवता दूतेन गूढ वृत्या रहस्यभूमिं प्रापितास्तत्र स्त्रीणां व्यभिचारदोषमुत्पाद्य सद्य: साशङ्का: कलृप्तवेशान्तरा जारा: क्षुद्रमार्गैर्निष्क्रामन्ति तद्वदिति ध्वनि: ।[९५]

## ५.६ वीप्सा

वीप्सा म्हणजे पुनरावृत्ती. काव्यात अनेक ठिकाणी अशी पुनरावृत्ती आपल्या दृष्टीस येते. या पुनरावृत्तीतून काही ध्वनी अर्थ निघतो. म्हणून काव्यात तिचा वापर केलेला असतो. मेघदूत काव्यामध्ये सुद्धा अनेक ठिकाणी श्लोकांत आपणाला ही पुनरावृत्ती आढळते जिचा उल्लेख मल्लिनाथाने टीकेत केलेला आहे ती वीप्सेची उदाहरणे पुढीलप्रमाणे –

**पूर्वमेघ**

श्लोक क्र. (१२)

सुहृत्समागम: कालश्च कालशब्देनोच्यते। विप्सायां द्विरुक्ति: ।[९६]

श्लोक क्र. (१३)

यत्र मार्गे खिन्न: खिन्नोऽभीक्ष्ण क्षीणबल: सन्। "नित्यवीप्सयो:" इति नित्यार्थे द्विर्भाव:।[९७]

श्लोक क्र. (२३)

पर्वते पर्वते प्रतिपर्वतम्। विप्सायां द्विरुक्ति: ।[९८]

श्लोक क्र. (६१)

तांस्तान् । विप्सायां द्विरुक्ति: ।[९९]

**उत्तरमेघ**

श्लोक क्र. (४९)

तं तम् । वीप्सायां द्विरुक्ति: ।[१००]

## ५.७ पौराणिक संदर्भ :

कालिदासाने जे 'मेघदूत' हे काव्य लिहिले, मल्लिनाथाने त्यावर 'संजीवनी' नावाची टीका लिहिली. कालीदासाने आपल्या काव्यात जे जे पौराणिक संदर्भ दिलेले आहेत त्या सर्व पौराणिक संदर्भांचे ज्ञान मल्लिनाथाला होते. म्हणूनच मल्लिनाथाने आपल्या टीकेत त्या सर्व पौराणिक संदर्भांचा उल्लेख केलेला आहे. मल्लिनाथाच्या टीकेत जे काही पौराणिक संदर्भ आले आहेत त्याचा निर्देश या प्रकरणामध्ये करण्यात येत आहे. या भागाची मांडणी श्री. र.भा. गोडबोले यांच्या 'प्राचीन भारतीय चरित्रवंश कोश' या ग्रंथाच्या आधारे करण्यात आली आहे.

### १) जनकतनया [१०१]

मेघदूतातील, पूर्वमेघात अगदी पहिल्याच श्लोकात 'जनकतनया' या पदाचा उल्लेख आहे. कुबेराने शाप दिलेला यक्ष जो रामगिरीवर रहात होता तेथे असलेले जे पाणी आहे ते सीतेच्या स्नानाने पवित्र झाले आहे असा या श्लोकात उल्लेख आलेला आहे.

आपणाला सीतेविषयी अनेक पौराणिक कथा माहीत आहेत. त्यामध्ये तिचे नांव सीता का पडले या विषयीची एक कथा प्राचीन चरित्र कोशात दिलेली आहे ती अशी –

सीता ही सीरध्वज जनकाची मुलगी म्हणून प्रसिद्ध असली तरी ती त्याची औरस कन्या नव्हती. हिच्या जन्माची कथा अशी आहे – जमीन नांगरीत असता नांगराच्या फाळाला लागून वर आली. नांगरताना नांगराने पडणाऱ्या पाळीला सीता असे म्हणतात. त्यातून निघाली म्हणून या मुलीचेही नांव सीता असे ठेवण्यात आले.

दुसरी कथा अशी आहे – पद्मास नांवाचा एक राजा होता. त्याने लक्ष्मी आपली कन्या व्हावी म्हणून विष्णूला प्रसन्न केले. विष्णूने दिलेल्या महाळुंगातून सुंदर कन्या निघाली. या कन्येच्या स्वयंवरप्रसंगी दैत्यांनी त्याला ठार केले. तेव्हा लक्ष्मीने लज्जा रक्षणाकरिता अग्नीत उडी टाकली. एकदा ही अग्निकुंडातून बाहेर येऊन बसली असता विमानांतून जाणाऱ्या रावणाने हिला पाहिले व कामातुर होऊन तो तिच्या मागे लागला. तेंव्हा ती पुन्हा अग्नीत प्रविष्ट झाली ते पाहून रावणाने अग्नि विझवून हिचा शोध घेतला तेव्हा त्याला तेथे पाच रत्ने सापडली. तो, ती रत्ने पेटीत घेऊन आला आणि त्याने ती पेटी देवघरात ठेवली व मंडोदरीस म्हणाला, मी तुझ्याकरीतां रत्ने आणली आहेत. नंतर असे आढळून आले की ती पेटी कोणालाही हालत नाही व तिचे झाकणही काढता येत नाही. तेव्हा रावणाने ती पेटी फोडली असता त्या पेटीतून एक सुंदर कन्या बाहेर पडते. तिला पाहून सर्व चकित होतात. मंडोदरीने मात्र हिच्यामुळे पद्माक्षाच्या घराचा नाश झाला हे सांगितले व हिला आपल्या घरात ठेवता कामा नये असे बजाविले. तेव्हा हिला करंडीत घालून दूरदेशी नेऊन पुरून टाकण्याचे ठरले. हिने जाताना सांगितले होते की, रावणाचा आणि त्याच्या इतर सहकाऱ्यांचा नाश करीन. नंतर ती पेटी मिथिल देशात आणून पुरली. तीच भूमी सूर्यग्रहणानिमित्त मिथिल राजाने ब्राह्मणाला दिली. ब्राह्मण नांगरीत असता त्याला ती पेटी सापडली. ती त्याने राजाकडे पाठविली. राजाने या मुलीचे कन्येप्रमाणे पालन केले, तीच सीता होय.

तिला मातुलिंगातून निघाल्यामुळे मातुलिंगी, अग्नीत शिरल्यामुळे अग्निगर्भा, रत्नात राहिल्यामुळे रत्नावती, धरणीतून निघाल्यामुळे धरणीजा, जनकाने पाळल्यामुळे जानकी, नांगराच्या फाळाबरोबर निघाल्यामुळे सीता, पद्मास राजाची कन्या म्हणून पद्मा अशी अनेक नांवे आहेत असे वर्णन अद्भूत रामायण सार यात केलेले आढळते.

## २) मघोन [१०२]

मघोन म्हणजे इंद्र असा मेघदूतात अर्थ दिला आहे. मेघ हा इंद्राचा मुख्य अधिकारी आहे असे त्याचे वर्णन आले आहे. मेघाला 'मघोनः प्रकृतिपुरुष' म्हटले आहे. कारण 'इंद्र' ही पाऊस पाडणारी देवता आहे. इंद्र मेघाकरवी भूतलावर पाऊस पाठवितो अशी कल्पना केली आहे म्हणून त्याला इंद्राचा 'प्रकृतिपुरुष' म्हटले आहे.

इंद्राविषयी इतर सुद्धा उल्लेख आहेत. यावरून त्याची माहिती अशी दिली आहे की इंद्र हा अदितीचा पुत्र. हा श्रावण महिन्यातील सूर्य आहे असा भागवत पुराणामध्ये उल्लेख आला आहे व देवांचा राजा आहे. एकदा गरूडाच्या पाठीवर बसून नाग जात असता गरुड इतका उंच गेला कीं, ते सगळे सूर्यतापाने मूर्च्छित होऊन जमिनीवर पडले. तेव्हां त्यांची माता कद्रू हिने इंद्राची स्तुती करून ताप शमनार्थ पाऊस पाडला. स्कंदपुराणात याने मंदार पर्वताचे पंख तोडून टाकिले होते असा उल्लेख आलेला आहे.

## ३) धनपति [१०३]

धनपति म्हणजे कुबेर. कुबेराने सांगितलेल्या कामात काहीतरी चूक यक्षाने केली म्हणून त्याने यक्षाला आपल्या पत्नीपासून एक वर्षभर तुला विरह सहन करावा लागेल असा शाप दिला.

कुबेर हा वैवस्वत मन्वंतरातील विश्रवा ऋषींचा पुत्र. इडविडा व मंदाकिनी अशी याच्या आईची नांवे आहेत. हा पुलस्त्य व गो यांचा पुत्र म्हणून याला वैश्रवण व एडविड असे म्हटले आहे. ब्रह्माने राक्षसगणांसह यास लंका व पुष्पक विमान, यक्षाचे अधिपत्य, राजराजत्व, धनेशत्व वगैरे पुत्र दिले. त्यापैकी रावणाने लंका व पुष्पक ही घेतली. याने धनपतित्वासाठी तप केले व हा कुबेर झाला व याच तपामुळे त्याला वर उल्लेखिलेल्या गोष्टी प्राप्त झाल्या. हा उत्तराधिपती असून उत्तरेस असलेल्या यक्ष लोकांत राहतो. याला मणिग्रीव व नलकबूर नावाचे दोन मुलगे होते. वृद्धि ऋद्धि याच्या शक्ति आहेत. याची कुबेरसभा नावाची एक सभाा आहे. मेरू पर्वताच्या उत्तरेस विभावरी हे याचे वसतिस्थान आहे.

## ४) हर [१०४]

शंकराच्या डोक्यावरील चन्द्रिकेने चकचकीत केलेले धनिकांचे वाडे असलेल्या कुबेराच्या अलका नावाच्या नगरीमध्ये यक्षाची पत्नी राहते. त्या ठिकाणी यक्षाने मेघाला जावयास सांगितले

आहे. अलकानगरीच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करताना मेघदूतातील एका श्लोकात हर म्हणजे शंकराचा उल्लेख आला आहे.

### ५) रघुपति [१०५]

रामाच्या बाबतीत 'रघुपतिपदैः' असा शब्दप्रयोग मेघदूतात आला आहे. याचा अर्थ रामाच्या पायांनी चिन्हित असलेल्या रामगिरी नावाच्या पर्वताचा श्लोकात उल्लेख आला आहे.

दशरथास कौसल्येपासून झालेला राम हा ज्येष्ठ पुत्र आहे. हा विष्णूचा अवतार होता. हा वैवस्वत मन्वंतरातील त्रेतायुगात झाला. याचे नामकरण व व्रतबंध झाल्यावर वसिष्ठांकडून शास्त्रे व शस्त्रे यांचे शिक्षण याला मिळाले. पित्याचा शब्द खरा करण्याकरितां याला चौदा वर्षे वनवासाला जावे लागले. नागरिकांच्या जमावात राम पायीच संध्याकाळी तमसेवर येवून तेथे संध्या करून रात्री निद्रा घेतली व पहाटेच लोकांना चुकवून अनेक नद्या ओलांडीत राम दक्षिणेकडे गेला. नंतर पुढे प्रयागात येऊन भरद्वाजाला भेटला. आणि चित्रकूटावर पर्णकुटिका बांधून राहिला. हा चित्रकूट म्हणजे रामगिरी असे मल्लिनाथाचे म्हणणे आहे आणि याच रामगिरी पर्वतावर रामाच्या पायांची चिन्हे आहेत असा उल्लेख मेघदूतातील बाराव्या श्लोकात आला आहे.

### ६) विष्णो [१०६]

मेघदूतात विष्णूची उपमा मेघाला दिली आहे. वासुकी नागाच्या फणिमध्ये असणारी जी रत्ने आहेत त्यातून निघणारी जी किरणे आहेत ती इंद्रधनुष्याप्रमाणे दिसतात आणि त्या किरणांमुळे विष्णूचा रंग जरी सावळा असला तरी तो झळकत आहे. अगदी त्याचप्रमाणे मेघाचे शरीरही श्यामवर्ण असले तरी शोभा प्राप्त करीत आहे.

विष्णू विषयी इतर काही पौराणिक संदर्भ आहेत ते असे – विष्णू हे अनादि व अनंत अशा परमेश्वराचे नाव आहे. हा सत्वगुणप्रधान असून पृथ्वीच्या पालनाचे काम याच्याकडे आहे. म्हणून हा वेळोवेळी अवतार घेऊन दुष्टांचा संहार करतो आणि पृथ्वीचे पालन करतो. याला चार हात असून त्यात शंख, चक्र, गदा व पद्म ही आयुधे असतात. लक्ष्मी ही त्याची पत्नी आहे व त्याचे स्थान वैकुंठात आहे. कधी कधी हा शेषावर समुद्रात शयन करतो. स्कंदपुराणात उल्लेख केल्याप्रमाणे याने हजार कमलाने काशी विश्वेश्वराचे पूजन चालू केले असता एक कमल कमी आले म्हणून आपला डावा डोळा काढून शंकरास वाहिला. याचे अनेक अवतार आहेत व त्यांचा उल्लेख महाभारत, भागवत, हरिवंश ब्रह्म वगैरे पुराणात आलेला आहे.

### ७) उदयन [१०७]

उदयन हा चंद्रवंशातील प्रसिद्ध राजा होता. तो सहस्रानीक राजाचा पुत्र होता. हा वत्स देशाचा राजा असल्यामुळे याला वत्सराज असेही म्हणतात. हा अनेक लोककथांचा नायक होता. कौशांबी ही त्याची राजधानी.

सोमदेवाच्या बृहत्कथेत उदयनाची कथा विस्ताराने दिली आहे. उज्जयिनीचा सम्राट प्रद्योत उर्फ चंडमहासेन याला वासवदत्ता नावाची कन्या होती. तिचे संजय नावाच्या राजाशी लग्न लावावे असा त्याचा बेत होता. परंतु वासवदत्तेने वत्सराज उदयनाला स्वप्नांत पाहिले आणि तिचे त्याच्यावरच प्रेम जडले. उदयनाला तिने गुप्तपणे संदेश पाठविला, तेव्हा प्रद्योनाच्या इच्छेविरुद्ध तिचे हरण केले, अवन्ति देशातील लोक (माळव्यातील) या उदयन राजाच्या कथा आठवून वृद्ध सांगत आहेत.

### ८) चंद्रहास (दशमुख) [१०८]

मेघदूतामध्ये रावणाचा आणि त्याच्या चन्द्रहास नावाच्या तलवारीचा उल्लेख आला आहे. विशाला नगरीचे वर्णन करण्याकरितां हा शब्दप्रयोग आला आहे. त्या विशाला नगरीत युद्धात रावणाच्या समोर उभे राहणारे आणि चंद्रहासाच्या घावांच्या खुणांनी अलंकारांची शोभा मागे टाकणारे योधाग्रणी आहेत. चंद्रहास हे रावणाच्या खड्गाचे नांव. आपल्या चकाकीने ते जणू चंद्राला हासत आहे म्हणून त्याला चंद्रहास असे म्हणू लागले.

रावण हा मोठा शिवभक्त होता. रोज शिवपूजन केल्याखेरीज तो अन्नग्रहण करीत नसे. एकदा त्याच्या मनात आले की रोज लंकेतून कैलासावर शिवपूजेला जाण्यापेक्षा कैलास पर्वतच उचलून जर लंकेत आणला तर छान होईल. म्हणून त्याने कैलास पर्वत लंकेत आणण्याचे ठरविले व त्याप्रमाणे कैलासाला जाऊन तो पर्वत आपल्या वीस हातांनी धरून उपटू लागला. ते पाहून पार्वती घाबरली. तेव्हा शंकराने त्या पर्वताला आपल्या पायाच्या अंगठ्याने दाबले व रावण त्याखाली चिरडला अशी कथा आहे.

### ९) नीलकंठ [१०९]

नीलकंठ म्हणजे शंकर. शंकराने समुद्र मंथनातून निघालेले हालाहल प्राशन केल्यामुळे त्याच्या दाहाने त्याचा कंठ जळून तो निळा झाला व त्यावरून शंकराला 'नीलकंठ' असे नांव पडले. शंकराची जी आठ स्थाने आहेत त्या आठ स्थानांपैकी 'आकाश' हे एक स्थान आहे. त्या

आकाशात निळ्या रंगाचा मेघ दिसताच शंकराच्या गणांना त्याच्या कंठाचा भास झाला. शंकराच्या कंठाप्रमाणे याचाही रंग निळा असल्यामुळे शंकराच्या गणांकडून तो आदरयुक्त पाहिला गेला, असे वर्णन मेघदूतात आले आहे.

शिवशंकर हा त्रिलोकात प्रसिद्ध आहे. म्हणून लोकांनी त्याची तीन स्वरूपे मानली आहेत. एक म्हणजे आकाशात-तारकलिंग, दुसरे पाताळात-हाटकेश्वर, आणि तिसरे मृत्युलोकांत-महाकाल. अशा मृत्युलोकातील पवित्र महाकालेश्वराला जाण्यास यक्षाने मेघाला सांगितले आहे.

**१०) भवान्या** [११०]

भवान्या म्हणजे पार्वती. पूर्वी गजासुर नावाचा एक असुर अतिशय प्रबळ झाला व देवांदिकास फार त्रास देऊ लागला, तेव्हा सर्वांनी काशीविश्वेश्वराच्या देवळांत शंकराचा आश्रय घेतला व त्याला गजासुरापासून आपले रक्षण करण्यास प्रार्थना केली. तेव्हा शंकराने गजासुराला मारले व त्याने चामडे सोलून काढून ते आपल्या अंगावर पांघरले व तांडवनृत्य करण्यास प्रारंभ केला. शंकराने गजासुराचे ओले चामडे पांघरलेले पाहतांच पार्वतीला भीती वाटून तिने आपले नेत्र मिटून घेतले म्हणून मेघदूतात यक्ष मेघाला सांगतो की, त्या चामड्याच्या जागी तूच राहा. म्हणजे तुझ्या लालसर रंगामुळे शंकराला गजचर्माची आठवण होणार नाही, आणि पार्वतीला भीती वाटणार नाही व ती तुझ्या भक्तीमुळे तुझ्याकडे कौतुकाने पहात राहील.

**११) स्कन्द** [१११]

स्कन्द म्हणजे कार्तिकेय. हा कार्तिकेय देवगिरी पर्वतावर कायम वस्ती करून राहिलेला आहे. आणि अशा कार्तिकेयाला पुष्पाचा मेघ बनून आकाशगंगेच्या जलाने ओल्या झालेल्या पुष्पांच्या वृष्टीने स्नान घालण्यास यक्षाने सांगितले आहे. कारण हा कार्तिकेय दुसरा कोणी नसून शंकर आणि पार्वती यांचा पुत्र आहे. शंकराचेच ते तेज आहे. म्हणून त्याला शंकरा इतकेच पूज्य मानावे असे यक्षाने मेघाला सुचविले आहे.

या कार्तिकेयाच्या जन्माविषयी पुढील कथा प्रसिद्ध आहे - तारकासुर नावाचा राक्षस महाप्रबळ होऊन देवांना त्रास देऊ लागला. तेव्हा त्याच्या जाचातून सोडविण्याकरिता देवांनी शंकराची आराधना केली. शंकरांनी त्यांना त्या त्रासातून सोडविण्याचे अभिवचन दिले व स्वत: पार्वतीबरोबर एकांतात राहू लागले. देवांनी पुष्कळ वाट पाहिली व शेवटी अग्नीला शंकराकडे पाठविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे अग्नि कबुतराचे रूप घेऊन शंकरपार्वती एकांतात होती तेथे गेला.

शंकरांनी त्याला ओळखले व आपले स्खलन झालेले रेत त्याच्या मुखात टाकले. अग्नीला ते सहन झाले नाही तेव्हा त्याने ते गंगेत टाकले. तेथून ते सहा कृत्तिकांच्या गर्भात गेले. त्यांनाही ते सहन न झाल्यामुळे त्यांनी ते 'शर' नावाच्या गवताच्या बेटात टाकले. तेथे त्यापासून पुत्र उत्पन्न झाला व त्याने तारकासुराचा वध केला. तोच हा स्कन्द. शंकराच्या स्खलन झालेल्या रेतापासून जन्म झाल्याने ह्याला 'स्कन्द' म्हणतात. अग्निच्या मुखात ते रेत प्रथम पडले म्हणून त्यास 'अग्निभू' म्हणतात. नंतर ते तेज गंगेत पडले म्हणून गांगेय. तेथून सहा कृत्तिकांच्या गर्भात गेले म्हणून 'कार्तिकेय' पुढे 'शर' नावाच्या गवताच्या बेटांत जन्मल्यावरून 'शरजन्मा' अशी स्कन्दाची एकंदर तीस नावे स्कन्दपुराणातील एका स्तोत्रात सांगितली आहेत.

### १२) रन्तिदेव [११२]

रन्तिदेव राजाविषयी एक कथा आहे, ती अशी – रन्तिदेव हा भरत कुळात उत्पन्न झालेला एक राजा होता. तो अतिशय वैभवशाली, धार्मिक आणि उदार होता. त्याने इतके गो यज्ञ केले की, यज्ञात मारलेल्या गाईच्या कातड्यातून स्त्रवणाऱ्या रक्ताने नदी निर्माण झाली. तिला चर्मण्वती म्हणतात. या गो यज्ञाबद्दल रन्तिदेवाची जी कीर्ती झाली तीच पृथ्वीवर प्रवाह रूपाने परिणत झाली. सध्या ही नदी 'चंबळा' या नावाने ओळखली जाते. या रन्तिदेव राजाच्या कीर्तीला मान देण्याच्या इच्छेने यक्षाने मेघाला तेथे थोडावेळ थांबावयास सांगितले आहे.

### १३) गांडीवधन्वा [११३]

गाण्डीवधन्वा म्हणजे अर्जुन. अर्जुनाने कौरव-पांडव युद्धात फार मोठा पराक्रम केला. त्याने असंख्य तीक्ष्ण बाणांनी राजे लोकांवर वर्षाव केला. अशा क्षत्रियांच्या लढ्याची आठवण करून देण्याऱ्या कुरुक्षेत्रास यक्षाने मेघाला जावयास सांगितले आहे.

कुरुक्षेत्रासंबंधी गीतारहस्यात अशी माहिती आहे – कुरुक्षेत्र म्हणजे हस्तिनापूरच्या सभोवतालचे मैदान. कौरवपांडवांचा पूर्वज कुरु राजा ह्या मैदानावर नांगर धरून कष्टाने नांगरीत होता म्हणून त्याला कुरुक्षेत्र असे म्हणतात. पुढे इंद्राने या क्षेत्रांत जे तप करतील किंवा युद्धात मरतील त्यास स्वर्गप्राप्ती होईल असा वर दिल्यावर त्याने हे क्षेत्र नांगरण्याचे सोडून दिले. इंद्राच्या या वरामुळेच या क्षेत्राला धर्मक्षेत्र असे नाव पडले. याच मैदानावर परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय करून पितृतर्पण केले.

## १४) लाङ्गली [११४]

लाड़गली हे बलरामाचे नाव आहे. लाड़गल म्हणजे नांगराचा फाळ. हे बलरामाचे हत्यार असल्यामुळे त्याली लाड़गली म्हणतात. कौरव-पांडव युद्धात बलरामाने बंधुप्रेमामुळे सहभाग घेतला नाही. तो तीर्थयात्रा करावयास निघून गेला व त्या यात्रेतच तो सरस्वती नदीवर आला होता. म्हणून यक्ष मेघाला म्हणतो की, बंधुप्रेमामुळे रणविमुख झालेला बलराम रेवतीच्या नेत्रांचे प्रतिबिंब पडलेली, मधुररसास्वादाची सुरा सोडून देऊन ज्या सरस्वतीचे सेवन करिता झाला त्या सरस्वती नदीच्या जलाचे सेवन केल्यानंतर तू देखील वर्णाने फक्त काळा पण आतून शुद्ध होशील. या गोष्टीच्या उल्लेखासाठी मेघदूतात 'लाङ्गली' हे पद वापरण्यात आलेले आहे.

## १५) जान्हवी [११५]

जान्हवी म्हणजे गंगा. तिला जान्हवी हे नाव कसे पडले याविषयीची एक कथा सांगितली जाते, ती अशी - सगर हा सूर्यवंशातील राजा होता. त्याचा शंभरावा अश्वमेध यज्ञ चालला असता इंद्राने त्याचा घोडा चोरून नेला व पाताळांत कपिल मुनिंच्या आश्रमात बांधून ठेवला. त्या घोड्याच्या संरक्षणार्थ पाठविलेल्या सगर राजाच्या साठ हजार पुत्रांनी घोड्याचा शोध करण्याकरितां पृथ्वी खणली. जेव्हा पाताळात कपिल मुनिंच्या आश्रमा जवळ घोडा चरताना त्यांना आढळला तेव्हा त्यांनी कपिल मुनीनेच आपला घोडा चोरला असे समजून त्यांचा अपमान केला. त्या अपमानाने क्रोधाविष्ट होऊन कपिल मुनींनी सगर पुत्रांना जाळून भस्म केले. पुढे त्यांच्याच वंशात जन्मलेल्या भगीरथाने आपल्या पूर्वजांचा उद्धार करण्यासाठी तपश्चर्या करून स्वर्गातून गंगा पृथ्वीवर आणली. ती प्रथमत: शंकराच्या जटाजुटात राहिली. भगीरथाने गंगा नदीला स्वर्गातून खाली आणले परंतु तिचा प्रवाह वाटेत जह्नुऋषींचा आश्रम वाहून नेऊ लागला. तेव्हां त्या ऋषीने तिला पिऊन टाकले. भगीरथाने पुन्हा जह्नुची प्रार्थना केली तेव्हा त्याने तिला आपल्या कानातून बाहेर सोडले. या जान्हवीने पुढे सगरपुत्रांचा उद्धार करून त्यांना स्वर्गास नेले. म्हणून हिला जह्नु-कन्या जान्हवी असे म्हणू लागले आणि अशा या जान्हवीकडे जाण्यास यक्ष मेघाला सांगत आहे.

## १६) भृगुपति [११६]

भृगुपति म्हणजे परशुराम.हा कैलास पर्वतावर शंकराजवळ धनुर्वेद शिकला. एके दिवशी कार्तिकेयाने क्रौंच पर्वताला रन्ध्र पाडले असे ऐकले तेव्हा भृगुपतिला त्याचा मत्सर वाटू लागला व

त्याने स्वत: एक बाण क्रौंच पर्वतावर मारून त्याला रन्ध्र पाडले. तेथे पडलेले हे रन्ध्र त्याच्या सामर्थ्याचा पुरावा, म्हणजेच त्याच्या यशाचा मार्गआहे. क्षत्रियांचा नि:पात करण्यासाठी, व दक्षिणेत जाण्यासाठी हा मार्ग आपल्या बाणाने परशुरामाने तयार केला असे सांगण्यात येते. प्रतिवर्षी मानस सरोवराकडे जाणारे हंस याच मार्गाने जातात अशी कल्पना आहे; म्हणून त्याला मेघदूतात हंसद्वार असेही म्हटले आहे. परशुरामाच्या या कृत्याने त्याची कीर्ती हिमालयाच्या सर्व बाजूला पसरली. म्हणूनच हा क्रौंचरन्ध्र परशुरामाच्या कीर्तीच्या प्रसाराचा मार्ग होतो. या पडलेल्या रन्ध्रांतून यक्षाने मेघाला तिरपे होऊन उत्तर दिशेला जा असे सांगितले आहे.

## १७) इंद्रनुष्य [११७]

मेघदूतातील पूर्वमेघा श्लोक क्र.१५ मध्ये इंद्रधनुष्याचा उल्लेख आला आहे. वासुकि नागाच्या फणीमध्ये असलेले जे मणि आहेत त्यांची किरणे वारुळाच्या छिद्रातून निघून इंद्रधनुष्याच्या रुपात दिसतात असे पौराणिक आख्यान आहे. वस्तुत: सूर्याची विभिन्न रंगांची किरणे वायूमध्ये मिसळून एकत्र होतात आणि आकाशात ढग आल्यावर धनुष्याच्या आकाराप्रमाणे पहावयास मिळतात. त्यालाच इंद्रधनुष्य म्हणतात असे प्रसिद्ध ज्योतिषकार वराहमिहिराचार्य यांचे मत आहे. वराहमिहिराने इंद्रधनुष्याची उत्पत्ती पुढीलप्रमाणे दिली आहे. – सूर्यस्य विविधवर्णा: पवनेन विघट्टिता: साभ्रे। वियति धनु: संस्थाना ये दृश्यन्ते तदिन्द्रधनु:। केचिदनंतकुलोरगनिश्वासोद्भूतमाहुराचार्या:।

## १८) पुष्करावर्तक [११८]

मल्लिनाथाने 'पुष्कर' व आवर्तक ही मेघांची दोन वेगवेगळी कुळे मानलेली आहेत. पण काही पंडितांनी पुष्करावर्तक याची उत्पत्ति 'पुष्करं जलं आवर्तयन्ति भ्रामयन्ति इति पुष्करावर्तका:' अशी दिली आहे. ती मान्य केल्यास 'पुष्करावर्तक' हे एकच कुळ ठरते. ब्रह्मांडपुराणात मेघाची उत्पत्ती तीन प्रकारची वर्णिली आहे. १) अग्नीपासून २) ब्रह्माच्या श्वासोच्छवासापासून व ३) इंद्राने पर्वताचे जे पंख तोडले त्यापासून. या तिसऱ्या प्रकारापासून उत्पन्न झालेल्या ढगांना पुष्करावर्तक म्हणतात व त्याचे लक्षण –

पुष्करा नाम ते मेघा बृहन्तस्तोयमत्सरा:।
पुष्करावर्तकास्तेन कारणेनेह शब्दिता।।
नानारुपधरास्ते तु महाधीरस्वनास्तथा।
कल्पान्ते वृष्टिकर्तार: संवर्ताग्नेर्नियामका:।।

असे वर्णिले आहे.

## ५.८ भौगोलिक संदर्भ :

कालिदासाच्या मेघदूतातील अनेक भौगोलिक संदर्भाचे ज्ञान मल्लिनाथाला होते. त्याने आपल्या टीकेत उल्लेख केलेल्या भौगोलिक संदर्भाचे विवेचन जनार्दन शास्त्री यांच्या मेघदूत या ग्रंथाला आधार मानून करण्यात आले आहे.

**पूर्वमेघ :-**

**(१) रामगिरी** :[११९] (श्लोक क्र.१)

मल्लिनाथाने चित्रकूट यालाच रामगिरी म्हटले आहे. परंतु हे योग्य नाही. कारण १७ व्या श्लोकात मेघाच्या मार्गाचा निर्देश करताना यक्षाने स्वत: म्हटले आहे 'अध्वक्लान्त प्रतिमुखगतं सानुमांश्चित्रकूटस्तुड़ग न त्वा जलद शिरसा वक्ष्यति श्लाघमान:।' म्हणजेच रामगिरीपासून चित्रकूटपर्यंत पोहचेपर्यंत मेघ अध्वक्लान्त होईल. यावरून असे स्पष्ट होते की चित्रकूट लांब असावे. वस्तुत: रामगिरी हाच 'रामटेक' पर्वत आहे. मराठीमध्ये टेक किंवा टेकडी पर्वताचे वाचक आहे. हे ठिकाण नागपूरपासून उत्तरेकडे जवळजवळ २४ मैलावर आहे. याच ठिकाणी भगवान रामचंद्राने तपस्या करताना शम्बूक नावाच्या शूद्रकाचा वध केला होता. आधुनिक संशोधनकर्त्यांनी मध्यप्रदेशातील रामगडालाच रामगिरी मानले आहे.

**(२) अलकानगरी** :[१२०] (श्लोक क्र.७)

अलकानगरी कैलास पर्वतावर आहे. त्याच ठिकाणी शंकराचे निवासस्थान आहे. कुबेर शंकराचा मित्र आहे.

**(३) मानससरोवर** :[१२१] (श्लोक क्र.११)

मानससरोवर कैलास पर्वताच्या जवळ आहे. आणि मेघाला जिथे जायचे आहे ती अलकानगरी ती सुद्धा कैलास पर्वताच्या जवळ आहे. म्हणून या श्लोकात असे म्हटले आहे की हे मेघा मानससरोवराला जाणारे हंस तुला कैलासापर्यंत साथ देतील.

**(४) मालनाम क्षेत्र** :[१२२] (श्लोक क्र.१६)

मल्लिनाथाने माल शब्दाचा अर्थ पठार असा केला आहे. परंतु भरमल्लिक वगैरे अनेक टीकाकारांनी 'मालाख्यो देश:' असे म्हटले आहे. या टीकाकारांना छत्तीसगड मध्यप्रदेशात जो माल जिल्हा आहे हा अभिप्रेत आहे, काही लोकांनी माल्दा, जे रतनपुरापासून उत्तरेकडे आहे यालाच माल म्हटले आहे.

**(५) आम्रकुट पर्वत** :[१२३] (श्लोक क्र.१७)

टीकाकारांनी अमरकंटक यालाच आम्रकूट मानले आहे. परंतु यक्षाने ज्या क्रमाने मेघाच्या मार्गाचा निर्देश केला आहे त्यावरून अमरकंटकला आम्रकूट मानणे सुसंगत होत नाही. संभवत: छिन्दवाडा जिल्ह्यात स्थित असलेला अमरवाडा तालुक्याच्या जवळपास सातपुडा पर्वताच्या कोणत्या तरी एका टेकडीचे नांव आम्रकूट असले पाहिजे.

**(६) विंध्याचल पर्वत** :[१२४] (श्लोक क्र.१९)

महेंद्र, मल्य, सह्य, शुक्तिमान,ऋक्ष, विंध्य आणि परियात्र या सात कुलपर्वतांमध्ये विंध्य एक आहे. याच्या पर्वत रांगा पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत पसरलेल्या आहेत. अशा प्रकारे हा भारताला उत्तरभारत आणि दक्षिणभारत या स्वरूपात दोन भागात विभक्त करतो. हिमालय आणि विंध्याचलाचा मध्यभाग याला आर्यावर्त म्हटले आहे. पुराणांमध्ये प्रसिद्ध आहे की अगस्त ऋषींनी याची वृद्धी थांबविली. तेव्हापासून लोकोक्ती प्रसिद्ध आहे –''न मुनि: पुनरायाति न चासौ वर्ध्दते गिरि: ।''

**(७) रेवा नदी** :[१२५] (श्लोक क्र.१९)

रेवा नर्मदा नदीचे नाव आहे. जी अमरकंटकपासून निघून पश्चिमेकडे वहात जात कम्बेच्या खाडीत पडते. या नदीची गणना पुण्य नद्यांमध्ये केली जाते. "गंगास्नानेन यत्पुण्यं तद्रेवादर्शनेन वै । यथा गङ्गा तथा रेवा तथा देवी सरस्वती ।" हे प्रसिद्ध आहे. या नदीच्या किनाऱ्यावर मिळणारा प्रत्येक दगड शिवस्वरूप (नर्मदेश्वर) असतो असे पुराणांमध्ये वर्णन आले आहे.

**(८) सारंग/चातक** :[१२६] (श्लोक क्र.२१)

मल्लिनाथाने याचा अर्थ मतङ्गजा कुरङ्गावा । असा अर्थ घेतला आहे. परंतु भरतमल्लिक यानी सारंग या शब्दाचा चातक हा अर्थ घेतला आहे. यासाठी कविने वापरलेले जललवमुच: हे पद विचारणीय आहे. पाण्याच्या एका थेंबासाठी मेघाची वाट पाहणारा चातक पक्षी नियमपूर्वक वर्षा ऋतूमध्ये फुलणाऱ्या कदम्ब आणि कर्दळीला पाहून तसेच ग्रीष्मात वनाग्निने जळालेल्या जंगलात पाण्याच्या पडणाऱ्या थेंबांनी उत्कट असा सुगंध घेऊन मेघाला बोलावितो. म्हणजेच जसजसा चातकांचा आवाज ऐकायला मिळेल तसतसा मेघ त्याची तहान भागविण्यासाठी पुढे पुढे जाईल.

**(९) दशार्ण** :[१२७] (श्लोक क्र.२४)

दशार्ण – "दश ऋणानि जलदुर्गाणि यस्मिन् या दशार्णांना निवासा जनपदा:" हा प्रदेश संभवत: मध्यप्रदेशातील छत्तीसगड असा भाग आहे जेथे दशार्ण नावाची नदी वाहते जी विंध्यांचलापासून निघालेली आहे.

**(१०) विदिशा** :[१२८] (श्लोक क्र.२५)

विदिशा प्राचीन काळात प्रसिद्ध नगरी होती. जी दशार्णची राजधानी सुद्धा होती. सध्या ऐतिहासिकांनी मालवा येथे असलेल्या मेलसा नावाच्या स्थानाला प्राचीन विदिशा मानले आहे. जी भोपाळपासून उत्तरपूर्व दिशेला २६ मैलावर स्थित आहे.

**(११) वेत्रवती नदी** :[१२९] (श्लोक क्र.२५)

वर्तमानातील म्हणजेच सद्य स्थितीतील वेत्रवती ही बेतवा नदी आहे.

**(१२) नीचैराख्यं गिरिम् – विंध्यांचल पर्वत** :[१३०] (श्लोक क्र.२६)

जनार्दन शास्त्री पाण्डेय यांच्यानुसार नीचैराख्य गिरि म्हणजेच विंध्याचल पर्वत आहे. कारण पुराणांमध्ये अशी कथा येते – एकदा मेरुपर्वताच्या ईर्षेने विंध्याचल पर्वत खूप उंच झाला होता. त्यामुळे सूर्याच्या मार्गाला अडथळा निर्माण झाला. तेव्हा देवतांनी अगस्त्य ऋषींना प्रार्थना केली. अगस्त्य ऋषी दक्षिण यात्रेच्या निमित्ताने त्याजवळ गेले. ऋषींना पाहून त्यांच्या विषयी आदर बाळगून विंध्य खाली वाकला आणि त्याने प्रार्थना केली की मी तुमची काय सेवा करु? तेव्हा मुनींनी म्हटले – मी परत येईपर्यंत तू खालीच वाकून रहा. अगस्त्य ऋषी दक्षिण दिशेला निघून गेले आणि परत आलेच नाहीत. तेव्हापासून तो खालीच राहिला. त्याची शिखरे वाढली नाहीत. यावरून स्पष्ट होते की नीचैराख्य पर्वत तोच जो विंध्याचल आहे.

**(१३) नवनदी** :[१३१] (श्लोक क्र.२७)

वननदी, नगनदी आणि नवनदी हे तीन पाठ टीकाकारांनी मानले आहेत. मल्लिनाथाने वननदी असे मानून जंगलातील नदी आणि वलल्भदेव वगैरेंनी नगनदी असे मानून डोंगरातील नद्या असा अर्थ केला आहे.

**(१४) उज्जयिनी** :[१३२] (श्लोक क्र. २८)

उज्जयिनीचे नांव अवन्ती सुद्धा आहे. धर्मशास्त्रांमध्ये सात नगरीमध्ये हीची गणना केली जाते. प्रसिद्ध महाकालाचे मंदिर इथेच आहे. कालीदासाने उज्जयिनीला एक महानगरी आणि विदिशाला 'विदिशालक्षणां राजधानी' म्हटले आहे. ही नगरी माळवा प्रांतातील सध्याचे उज्जैन आहे.

**(१५) सिंधू नदी** :[१३३] (श्लोक क्र.३०)

काला सिन्धु नावाची छोटीसी नदी माळव प्रांतात वहाते जी चंबळमध्ये येऊन मिळते. तिलाच या श्लोकात सिंधु म्हटले आहे.

**(१६) गन्धवती नदी** :[१३४] (श्लोक क्र. ३७)

गंधवती ही एक छोटीसी नदी आहे. जी महाकाल मंदिराच्या जवळूनच वाहते. ही शिप्रा नदीची एक शाखा आहे.

**(१७) महाकाल** :[१३५] (श्लोक क्र.३७)

शिव शंकर त्रिलोकात पूजनीय आहेत. लोक भेदानुसार त्यांचे तीन स्वरूप मानले आहेत. (१) आकाशात - तारकलिंग (२) पाताळात - हाटकेश्वर (३) मृत्युलोकात - महाकाल. याशिवाय महाकाल हे शंकराच्या बारा ज्योर्तिलिंगापैकी एक आहे.

**(१८) गंभीरा नदी** :[१३६] (श्लोक क्र.४४)

गंभीरा ही माळव प्रांतातील एक छोटी नदी आहे जी चंबळमध्ये जाऊन मिळते.

**(१९) देवगिरी** :[१३७] (श्लोक क्र.४६)

संभवत: देवगिरी म्हणजेच देवगड असावा. जो चंबळच्या दक्षिणेकडे माळवाच्या मध्यभागी स्थित आहे. याच ठिकाणी कार्तिकेयाचे मंदिर आहे. देवगड गाव झांशीपासून दक्षिण पश्चिम जवळजवळ ६० कि.मी. वर आहे.

**(२०) चर्मण्वती नदी** :[१३८] (श्लोक क्र.४९)

महाभारतामध्ये अशी कथा प्रसिद्ध आहे की दशपुराचा राजा रन्तीदेव याच्या गाई स्वर्गातील कामधेनूचे दिव्यस्वरूप पाहून राजाजवळ गेल्या आणि त्याला प्रार्थना केली की तुम्ही यज्ञात आमची आहुती दिली तर आम्ही सुद्धा स्वर्गात जाऊन अशा दिव्यरुपाला प्राप्त करून घेऊ. राजाने

त्यांचे म्हणणे ऐकले आणि हजारो गो मेध यज्ञ केले. यात मारल्या गेलेल्या गाईंच्या चामड्यांनी जणू काही एक डोंगर बनला. त्यातून रक्ताच्या धारा वाहिल्या. त्या धारांतून ऋषींच्या प्रतापाने चर्मण्वती नदी बनली. त्यामध्ये स्नान केल्याने तेवढ्याच गो मेध यज्ञांचे फळ प्राप्त होते.

**(२१) दशपुर** :[१३९] (श्लोक क्र.५१)

दशपुर हे कदाचित सद्य स्थितीतील रन्तिपूर आहे. जे चंबळपासून थोड्याफार प्रमाणात उत्तरेकडे आहे. काही लोक दशोर नावाच्या ठिकाणाला जे माळवा अंतर्गत मंदसोर जिल्ह्यात येते त्यालाच दशपूर म्हणतात. प्राचीन काळात हे अत्यंत वैभवपूर्ण नगर होते. याचे वर्णन अनेक ठिकाणी मिळते.

**(२२) ब्रह्मावर्त** :[१४०] (श्लोक क्र.५२)

दशपुरापासून थोडेसे पुढ ब्रह्मावर्त देश आहे. सरस्वती पंजाबमधील एक प्रसिद्ध नदी आणि दृषद्वती या दोन नद्यांच्या मधला भाग ब्रह्मावर्त म्हणून ओळखला जातो. जो हस्तिनापुरापासून उत्तर-पश्चिम कुरुक्षेत्रापर्यंत आहे.

**(२३) कनखल** :[१४१] (श्लोक क्र.५४)

कनखल हरिद्वाराजवळील असे ठिकाण आहे. जेथे डोंगरातून उतरणारी गंगा नदी समांतर जमिनीवर वहाते. हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे.

**(२४) सरल/देवदार वृक्ष** :[१४२] (श्लोक क्र.५७)

सरल आणि देवदार हे दोन्ही यज्ञीय काष्ठ आहेत. परंतु यांच्या जाती वेगवेगळ्या आहेत. देवदार वृक्ष मुळापासून गोलाकार वाढत जाऊन घनदाट फांद्यांनी भरलेला असतो. तसेच त्याच्या मुळाच्या तुलनेने खोडातील फांद्यांची लांबी कमी कमी होत जाते. त्यामुळे ते जणूकाही मंदिराच्या आकाराचे बनल्याप्रमाणे दिसते. त्याचा सुवास अत्यंत उग्र स्वरूपाचा असतो.

परंतु सरळ वृक्ष अतिशय उंच सरळ तानलेल्या स्वरूपात असतो. त्याच्या वरच्या बाजूस काही थोड्याच फांद्या असतात. याचे स्वरुप देवदार वृक्षापेक्षा वेगळे असते. याचा सुवास उग्र नसतो.

**(२५) शरभ** :[१४३] (श्लोक क्र.५८)

शरभ हा आठ पाय असणारा भयानक मृग आहे. याच्या शरीरात पंखांप्रमाणे असे काही अवयव असतात की ज्यायोगे तो उंच उडल्याप्रमाणे उड्या मारतो. पश्चिम नेपाळपासून मानस सरोवराकडे जाण्याच्या मार्गावर हे अधिकांश मिळतात. नेपाळच्या मंदिरांमध्ये यांच्या प्रतिकृती पहावयास मिळतात. ढगांच्या गर्जनेला हे सहन करू शकत नाहीत. आणि त्याला प्रतिकार करण्याच्या इच्छेने ढगांवर आक्रमण करतात. परंतु अत्यंत उंचावरून पडल्याने त्यांचे पाय तुटतात.

**(२६) वैभ्राज** :[१४४] (श्लोक क्र.१०)

शम्भुरहस्यानुसार विभ्राज नावाच्या गणाकडून रक्षण केल्या कारणाने या उद्यानाचे नाव वैभ्राज पडले. वस्तुत: चित्ररथ नावाच्या कुबेराच्या प्रसिद्ध उद्यानाच्या नावाचे हे नामांतर आहे.

**(२७) कुदपुष्प** :[१४५] (श्लोक क्र.५२)

कुंद हे एक प्रकारचे विशेष फूल आहे ज्याला संस्कृतमध्ये माघ्य म्हणतात. कारण ही फुले सर्वसाधारणपणे माघ महिन्यात फुलतात. याची खूप मोठी काटेरी झुडपी असतात. याची फुले पांढरी असतात. फुलांना सूर्योदयापूर्वीच तोडावे लागते नाही तर नंतर इतकी कोमेजून जातात की फुले तोडताना त्याचा देठच फक्त हातात येतो आणि याच्या सर्व पाकळ्या जमिनीवर पडतात.

अशाप्रकारे मेघदूतामध्ये आलेल्या आणि मल्लिनाथाने उल्तलेखिलेल्या भाव, रस, ध्वनी, अलंकार, वीप्सा, पौराणिक संदर्भ, भौगोलिक संदर्भ यांचे विवेचन पाहता मल्लिनाथाचे अगाध ज्ञान यातून स्पष्ट होते.

*****